(असाधारण)

शनिवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२५

अधिसुचना

क्र. : १२८/२०२५ **दिनांकः १६/०८/२०२५**

विषयः विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी विकास निधी, विद्यार्थी परिषद निधी, आकस्मीक निधी, सुरक्षा विमा निधी, युवामहोत्सव नोंदणी शुल्क व आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव प्रती कलाप्रकार प्रवेश शुल्क यामध्ये वाढीबाबत..

१. सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसुचित करण्यात येते की, दिनांक १४.०८.२०२४ रोजी संपन्न झालेल्या विद्यार्थी विकास मंडळ सभेमध्ये विषय क्र.०४ नुसार सुधारीत अंदाजपत्रकाचा अभ्यास करुन receipt आणि Payment मध्ये कुठे तफावत दिसुन येत आहे याबाबत अभ्यास करुन शिफारसी करण्याकरीता मा.प्र.कुलगुरु यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती.

२. गठित करण्यात आलेल्या समितीची सभा दि.०३.०१.२०२५, ११.०३.२०२५ व दि. २०.०३.२०२५ रोजी संपन्न झालेल्या असून समितीने **विद्यार्थी विकास निधी** यामध्ये व्यावसायीक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून **रुपये २२/- (अक्षरी रुपये बावीस फक्त) ऐवजी रुपये १५०/- (अक्षरी रुपये एकशे पन्नास फक्त)** तर अव्यावसायीक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून **रुपये ११/- (अक्षरी रुपये अकरा फक्त) ऐवजी रुपये ७५/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर फक्त), विद्यार्थी परीषद निधी रुपये ०६/- (अक्षरी रुपये सहा फक्त) ऐवजी रुपये २५/- (अक्षरी रुपये पंचवीस फक्त), आकस्मिक निधी रुपये ११/- (अक्षरी रुपये अकरा फक्त) ऐवजी रुपये ५०/- (अक्षरी रुपये पन्नास फक्त), विद्यार्थी सुरक्षा विमा निधी रुपये ११/- (अक्षरी रुपये अकरा फक्त) ऐवजी रुपये ४०/- (अक्षरी रुपये चाळीस फक्त), आंतर महाविद्यालयीन युवामहोत्सव नोंदणी शुल्क रुपये १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) ऐवजी रुपये २,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) व आंतर महाविद्यालयीन युवामहोत्सव प्रती कलाप्रकार प्रवेश शुल्क रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त) ऐवजी रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त)** याप्रमाणे वाढ करण्याकरीता विद्यार्थी विकास मंडळाकडे शिफारस करण्यात आली होती.

३. उपरोक्तप्रमाणे दिनांक १४.०८.२०२४ रोजी संपन्न झालेल्या विद्यार्थी विकास मंडळ सभेत विषय क्र.०४ नुसार गठित समितीच्या शिफारसीस विद्यार्थी विकास मंडळाचे दि. २८.०३.२०२५ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्रमांक १५. ३)अन्वये मान्यता प्रदान करण्यात येवून अधिष्ठाता मंडळामार्फत विव्दत परिषदेला शिफारस केलेली होती.

४. त्यानुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ३७ (१)(द)अन्वये अधिष्ठाता मंडळाने दिनांक १६.०६.२०२५ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र.४७ नुसार मान्यता प्रदान करण्यात येवून विद्या परिषदेस शिफारस करण्यात आलेली होती.

५. दिनांक १६.०६.२०२५ रोजी संपन्न झालेल्या अधिष्ठाता मंडळ सभेने विषय क्र.४७ अन्वये विद्या परिषदेस केलेल्या शिफारशीस विद्या परिषदेने दिनांक ०८.०७.२०२२५ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्रे.५६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासून **विद्यार्थी विकास निधी, विद्यार्थी परिषद निधी, आकस्मीक निधी, सुरक्षा विमा निधी, युवामहोत्सव नोंदणी शुल्क व आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव प्रती कलाप्रकार प्रवेश शुल्क यामध्ये** रकाना क्र. नुसार दर्शिल्याप्रमाणे वाढ करण्यात आली असून प्राप्त होणाऱ्या शुल्कांचे संवितरण रकाना क्र. मध्ये दर्शविल्यानुसार करण्यात यावे.

अ.क्र.	महाविद्यालयाने आकारावयाच्या शुल्काचा प्रकार	विद्यमान महाविद्यालय आकारत असलेले शुल्क	शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासून महाविद्यालयाने आकारावयाचे वाढीव शुल्क	शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासून महाविद्यालयाने विद्यापीठ खाती जमा करावयाचे शुल्क
१.	विद्यार्थी विकास निधी			
अ)	व्यावसायिक	२२/-	१५०/-	१५०/-
ब)	अव्यावसायिक	११/-	७५/-	७५/-
२.	विद्यार्थी परिषद निधी	०६/-	२५/-	२५/-
३.	आकस्मीक निधी	११/-	५०/-	५०/-
४.	सुरक्षा विमा निधी	११/-	४०/-	४०/-

आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव

अ.क्र.	विवरण	विद्यमान महाविद्यालय विद्यापीठ खाती जमा करीत असलेले शुल्क	शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासून महाविद्यालयाने विद्यापीठ खाती जमा करावयाचे शुल्क
१.	आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव नोंदणी शुल्क	१,०००/-	२,०००/-
२.	आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव प्रती कलाप्रकार प्रवेश शुल्क	३००/-	५००/-

स्वा/-
(डॉ. अविनाश असनारे)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ